(101)

क्रमांक : बीएम्आरडीए/एम्टीजी/२४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे [पूर्व] मुंबई ४०० ०५१.

दिनांक : 14 जानेवारी १९८२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, १९८१ रोजी झालेल्या चौविसाव्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

सन्माननीय सदस्यानी या बाबतींत कांही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

श्र. वि. आसगांवकर
[ श्र. वि. आसगांवकर ]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रती :
मा. ----------------------
----------------------
----------------------

एन्पो :

No. BMRDA/MTG/24.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th Floor, Bandra(East),
B O M B A Y - 400 051.

Date: 14th January, 1982.

The minutes of the 24th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 19th October, 1981 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

( S. V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To

All Members and Permanent Invitees.

The Officers of the B.M.R.D.A.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या

## चौविसाव्या बैठकीचे कार्यवृत्त.

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १९ ऑक्टोबर १९८१ ( सोमवार ) |
| वेळ | : | सकाळी ११.३० वाजता. |
| स्थळ | : | समिती कक्ष, सहावा माळा, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. |

बैठकीस उपस्थित राहिलेल्या सदस्यांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. ( कृपया परिशिष्ट पहावे ).

कुर्ला येथील कल्पना टॉकीजजवळ असलेल्या जमिनीच्या संदर्भात राज्य शासनाने ( नगरविकास विभाग ) महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमाच्या ३७ व्या कलमाखाली काढलेल्या निदेशाचा बैठकीच्या प्रारंभिच सदस्य श्री.ए.रा.कोपर्डे यांनी उल्लेख केला, प्रस्तुत जमीन हरित पट्टा आहे. शासकीय निदेशानुसार सदर जमिनीच्या निम्म्या भागाचे औद्योगिक परिमंडळात सशर्त रुपांतर करण्यात यावयाचा आहे. औद्योगिक परिमंडळात रुपांतर करण्यात यावयाचा जमिनीचा भाग वगळून, सदर जमिनीचा उर्वरित भाग त्या ठिकाणी बगीचा विकसित करण्यासाठी मोफत उपलब्ध करुन जमिनीचा मालक देईल, याशर्तीवर त्याला ही परवानगी देण्यात आली आहे. बृहन्मुंबईत यापुढे आणखी कोणत्याही प्रकारचे उद्योगधंदे सुरु करण्यास मनाई करण्याचे शासनाने सांप्रत धोरण असताना शासनाचा उपरोक्त आदेश कसा काय योग्य ठरतो. अशी पृच्छा श्री. कोपर्डे यांनी केली.

बाब क्रमांक १ : कार्यवृत्तास पृष्टी देणे :-

(१) दि. २३ मार्च १९८१ रोजी झालेली २३ वी बैठक.

(२) दि. २२ मे १९८१ रोजी भरलेली विशेष बैठक व

(३) दि. १७ जुलै १९८१ रोजी भरलेली विशेष बैठक.

दिनांक २३ मार्च १९८१ रोजी आयोजित २३ वी बैठक आणि दि. २२ मे १९८१ व दि. १७ जुलै १९८१ रोजी आयोजित विशेष बैठकांची कार्यवृत्ते पक्की करण्यात आली.

बाब क्रमांक २ : बाब क्रमांक एक मध्ये उल्लेखित बैठकांच्या कार्यवृत्ताच्या अनुरोधाने केलेली कार्यवाही.

प्रस्तुत विषयावर झालेल्या चर्चेच्या ओघात कांही सदस्यांनी खालील विशिष्ट विचार व मुद्दे मांडल्यावर अनुवर्ती कृतीची नोंद घेण्यात आली:--

(१) कुष्टरोग व जलउगम स्थाने यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही व कुष्टरोगाचा प्रसार पाण्याच्या माध्यमातून होत नाही आणि त्यामुळे आमजनतेच्या आरोग्यास धोका उद्‌भवत नाही, असा अभिप्राय देणारा आरोग्य सेवा संचालकांचा अहवाल पटण्याजोगा नाही, असे मत व्यक्त करण्यांत आले. आरोग्य संचालकांना, त्यांनी दिलेल्या अभिप्रायाचे स्पष्टीकरण करण्यासाठी प्राधिकरणाच्या आगामी बैठकीस निमंत्रित करण्यात यावे, अशीही इच्छा प्रदर्शित करण्यांत आली. कुष्टरोग्यांकरिता जेथे पाणी व अन्य सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत अशा व निर्धोक अंतरावर सध्याची कुष्टरोग वसाहत हलविण्यात यावी, असे सदस्यांचे मत झाले. कुष्टरोग निवारण विश्वस्तसंस्थेला १९७८ साली जमीन वितरित करताना राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाशी सल्लामसलत केली नव्हती अशी माहिती पुरविण्यांत आली.

(२) ठाणे-बेलापूर परिमंडळातील हवा प्रदुषणाचे महाराष्ट्र जलप्रदूषण प्रतिबंध मंडळातर्फे जे संनियंत्रण करण्यात येते, त्याबाबत सद्यस्थिती काय आहे, अशी सदस्यांनी विचारणा केली असता सदर मंडळाने पाच वर्षात १९ संनियंत्रण केंद्रे स्थापन करण्याचा एक कालबध्द कार्यक्रम आखल्याची आणि आतापर्यंत अशी १६ संनियंत्रण केंद्रे स्थापन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या कार्यांकरिता जलप्रदूषण प्रतिबंध मंडळाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वित्तसहाय्य करण्याची गरज नाही अशीही माहिती देण्यांत आली. या संनियंत्रण केंद्राच्या स्थलनिर्देशन नकाशाच्या प्रती सदस्यांना पुरविण्याचे मान्य करण्यांत आले. अध्यक्षांनी या संदर्भांत असे स्पष्टीकरण केले की, हवा प्रदूषण प्रतिबंधविषयक मध्यवर्ती अधिनियम बनविल्यामुळे xxxxxx xxxxxxxxxxxxxxxxxऔद्योगिक क्षेत्राकडून उद्‌भवणाऱ्या प्रदुषणा विरुध्द परिणामकारक उपाययोजना करणे शक्य होईल.

(३) प्राधिकरणाच्या २३ व्या बैठकीत, मध्य वैतरणा प्रकल्प, अन्य विशिष्ट कामें आणि योजनासंबंधीची माहिती मिळावी अशी आपण मागणी केली असता ती पुरविण्याचे मान्य करण्यात आले, पण अद्याप ती माहिती आपणास मिळाली नसल्याचे निवेदन श्री. वि.ग.धारप यांनी केले. त्या संदर्भात सांगण्यांत आले की, मध्य वैतरणा प्रकल्पाचे अन्वेषण अधीक्षक अभियंता, भातसा प्रकल्प मंडळ, ठाणे यांनी करून त्या संबंधीचा मसुदा प्रकल्प अहवाल ऑगस्ट १९८१ मध्ये त्यांनी मुख्य अभियंता, सिंचन विभाग, कोंकण परिमंडळ यांना सादर केला. या प्रकल्पान्वये बृहन्मुंबईचा पाणीपुरवठा प्रतिदिन १०३ दशलक्ष गॅलननी वाढविण्याची योजना आहे. सदर प्रकल्पाचा तपशील निश्चित करून त्याची त्वरित कार्यवाही केली जावी, अशी इच्छा सदस्यांनी व्यक्त केली.

(४) मुंबईला पाणीपुरवठा xxxxxxx करणा-या जलवाहिन्या ज्या गावांमधून जातात, त्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची चणचण आहे असे निवेदन करण्यात आले आणि ती दूर करण्यासाठी या जलवाहिन्यातून सदर गावांना पाणीपुरवठा करण्याची सूचना करण्यात आली. भिवंडी शहरालाही दिवसेंदिवस बिकट पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत असल्याने त्या शहराच्या पाणीपुरवठ्यात दुप्पट वाढ करण्याची गरज प्रतिपादण्यात आली.

भिवंडी येथे xxxxxxxxxx पाणी शुध्द करण्याची सोय असल्याने त्या ठिकाणी 'तानसा' च्या ऐवजी 'भातसा' चे पाणी पुरवण्यात यावे अशी सूचना करण्यात आली. या संदर्भात असे सांगण्यात आले की, महाराष्ट्र जलपुरवठा व जलनिस्सारण मंडळ एका प्रकल्पाची कार्यवाही करीत असून त्यात भिवंडी शहराची पाणीपुरवठ्याची गरज भागविण्याची तरतूद आहे. यावर मंडळाचा प्रकल्प पुरा होण्यास कदाचित विलंब लागेल अशी धास्ती व्यक्त करण्यात आली आणि म्हणून वरील पर्यायी पाणी पुरवठ्याची सोय करण्याची सूचना अमलात आणण्याची गरज आहे असे मत व्यक्त करण्यात आले. महानगरपालिका आयुक्तांनी सदर सूचनेची तपासणी करण्याचे मान्य केले.

(५) कुर्ला येथील संकल्पित वरपुला ( Over bridge ) चे जोडरस्ते बांधण्याची सूचना प्राधिकरणाच्या २३ व्या बैठकीत केली होती ती अमलात आलेली नाही अशी तक्रार करण्यात आली. ज्या गल्लीतून हा जोडरस्ता जातो त्या ' मसरानी लेन ' मध्ये सध्या मोकळी जागा उपलब्ध आहे. जोडरस्त्याच्या बांधकामात विलंब झाल्यास प्रस्तुत खुल्या जमिनीवर अतिक्रमण होण्याची शक्यता आहे. असेही निदर्शनास आणण्यात आले.

(६) सदस्यांनी केलेल्या चौकशीवरून प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन व दुबई ट्रान्सपोर्ट कंपनी (प्रा.) लिमिटेड (डुटको) यांनी दि. १४ ऑगस्ट १९८१ रोजी एका करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या करारात (१) पश्चिम बेट मुक्त मार्ग प्रकल्प, (२) ठाणे खाडी अंतर्देशीय जलवाहतूक प्रकल्प; आणि (३) उभय पक्षी मान्य होतील असे अन्य प्रकल्प हाती घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्याची तरतूद आहे. या कराराच्या प्रतिलिपी प्राधिकरणाच्या सदस्यांना माहितीकरिता पुरविण्याची सूचनाही अध्यक्षांनी केली. सदर करारात उल्लेख असलेल्या पहिल्या दोन प्रकल्पांची समग्र माहिती देणारी एक टिप्पणी प्राधिकरणाच्या अभिप्रायासह आगामी बैठकीत ठेवण्यात यावी, अशीही इच्छा व्यक्त करण्यात आली.

.........४/-

(७) फुले व फळांची घाऊक बाजारपेठ वांद्रे-कुर्ला समूहात वसविण्यात यावी आणि ती वाशी येथे स्थलांतरित करण्यात येऊ नये अशी सूचना करण्यात आली असता नागरी भू (कमाल धारणा व विनियमन) अधिनियमाखाली उपलब्ध होणारी मोकळी जमीन मिळवून अशी बाजारपेठ शक्यतो बृहन्मुंबईतच ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, अशी माहिती याप्रकरणी देण्यात आली.

(८) न्हावा शेवा बंदर प्रकल्पाच्या संदर्भात झालेल्या प्रगतीची अद्यावत माहिती प्राधिकरणाला देण्यात यावी अशी इच्छा सदस्यानी व्यक्त केली.

(९) हेटवणे प्रकल्पाच्या कामाची व्याप्ति विचारात घेता, सदर प्रकल्पाच्या कामासाठी अलग कर्मचारीवर्ग नियुक्त करण्याची शासनाला विनंती करण्यात यावी आणि या प्रकल्पाची तातडीने कार्यवाही करण्यात यावी अशीही सूचना करण्यात आली.

बाब क्रमांक ३ : १९८०-८१ सालचे प्राधिकरणाचे लेखे व त्यावरील वित्तीय सल्लागाराचा अहवाल.

प्राधिकरणाचे १९८०-८१ सालचे लेखे आणि त्यासंबंधीचा वित्तीय सल्लागाराचा अहवाल याला मंजुरी देण्यात आली.

बाब क्रमांक ४ : बृहन्मुंबईत ओशिवरा येथे जिल्हा केंद्र विकसित करणे.

वरील प्रश्नावर झालेल्या चर्चेत खालील मुद्दे उपस्थित होऊन त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

(१) ओशिवरे बस स्थानकाच्या बाजूला बेस्टच्या मालकीची जमीन असून ती बेस्ट कर्मचा-यांच्या एका सहकारी संस्थेला देण्यात आली आहे. ओशिवरा येथील संकल्पित व्यापारी केंद्राच्या जागेतून वरील जमीन वगळण्यात यावी. ही सूचना स्वीकारण्यात आली.

(२) १९८१ सालच्या जनगणनेवर आधारित शासनाने प्रसिध्द केलेल्या हंगामी आकडेवारीच्या आधारे, बृहन्मुंबईच्या उत्तर भागात १९७१ ते २००१ या कालावधीत नोक-या व लोकसंख्येच्या प्रमाणात वाढ दर्शविणा-या आकडेवारीच्या पटलात योग्य ती सुधारणा करण्यात यावी. ही सूचना मान्य करण्यात आली. १९८१ च्या जनगणनेवर आधारित बृहन्मुंबईतील लोकसंख्येची विभाग निहाय (Wardwise) आकडेवारी प्राधिकरणाच्या सदस्याना पुरविण्याचेही मान्य करण्यात आले.

..........५/-

(३) उपरोक्त जिल्हा केंद्रामध्ये अंतर्भाव करण्यात यावयाच्या जमिनीच्या ब-याच मोठया भागांवर झोपडपट्टयांचे अतिक्रमण होत आहे. जिल्हा केंद्रासंबंधीचा अहवाल पक्का करतेवेळी ही वस्तुस्थिती विचारात घेण्यांत यावी.

ठराव क्रमांक १९१ :

असा ठराव करण्यांत येत आहे की सर्वाधिक प्रादेशिक संरचनेवरील धोरणाचे पुन:स्मरण म्हणून वरील कार्यसूची टिप्पणीत प्रस्तावित केल्यानुसार, ओशिवरा, येथे जिल्हा केंद्र विकसित करण्याच्या प्रस्तावास याव्दारा मान्यता देण्यांत येत आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की ओशिवरा येथे जिल्हा केंद्र-विकास हाती घेण्याची गरज व तातडी राज्य शासनाला समजावून सांगण्यांत यावी व कार्यसूची टिप्पणीचे जोडपत्र 'अ' मधील नकाशा १ मध्ये ज्याच्या हद्दी स्पष्ट करण्यांत आल्या आहेत अशा जिल्हा केंद्राचे नियोजन आणि विकास यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४० अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यास विनंती करावी.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की जिल्हा केंद्राच्या योग्य व समन्वित विकासाकरिता जिल्हा केंद्र म्हणून राखून ठेवलेल्या क्षेत्रातील खाजगी मालकीच्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाच्या तरतुदींनुसार संपादन करण्यांत याव्यात.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, जिल्हा केंद्राच्या विकासाकरिता त्वरित नकाशे तयार करण्यासाठी व कृति करण्यासाठी आवश्यक वाटल्यास जादा कर्मचारीवर्ग नेमून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात एक खास उपशाखा निर्माण करावी.

बाब क्रमांक ५ : १९८०-८१ या वर्षाचा वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 'विशेष नियोजन प्राधिकरण' या नात्याने तयार केलेला वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने बाब टिपणी विचारात घेऊन पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक १९२ :

" असा ठराव करण्यांत येत आहे की सन १९६६च्या महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियमाचे कलम १३३ अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरणाच्या वार्षिक अहवालाच्या मसुद्यास याव्दारा प्राधिकरण मान्यता देत असून तो राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्तांस अधिकार देत आहे.

बाब क्रमांक ६ : श्री. आर. राधाकृष्णन्, लघुटंकलेखक, गृहनिर्माण, नागरी नूतनीकरण व परिसर विज्ञान मंडळ यांना क्षयाच्या आजारासाठी रजा व इतर सवलती देण्याबाबत.

बाब टिपणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक १९३ :

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ११(२) व कलम ५० नुसार प्रदत्त केलेल्या शक्तींचा वापर करुन त्यावेळचे महानगर आयुक्त यांनी श्री. आर्. राधाकृष्णन् लघु टंकलेखक यांना तीन वर्षाच्या अखंडीत सेवेची अट शिथिल करुन मंजूर केलेल्या क्षयरोग रजेस प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे.

श्री. राधाकृष्णन् यांना रुग्णालय प्राधिकाऱ्यांच्या शिफारशीवर अवलंबून व बिले सादर करण्याच्या अटीवर आहार भत्त्यासाठी दरमहा ३०/-रु. देणे तसेच प्रवास भत्ता देणे इ. उपरोक्त नियमांत अनुज्ञेय असलेल्या इतर आर्थिक सवलती, वर नमूद केलेली अट शिथिल करुन देण्यासही प्राधिकरण मान्यता देत आहे.

बाब क्रमांक ७ : वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राच्या अंतिम नियोजन प्रस्तावात किरकोळ फेरबदल ( लांबणीवर टाकलेली बाब).

बाब टिपणी विचारात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक १९४ :

असा ठराव करण्यांत येत आहे की महानगर प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे (महाराष्ट्र अधिनियम ३७ सन १९६६) कलम ४० (१) (क) नुसार वांद्रे-कुर्ला समूहाच्या अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त झालेले विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने प्राधिकरण वरील अधिनियमाची कलमे ४० (३), ११३ (अ) (८) व कलम ३७ अन्वये प्रदान केलेले व त्याला सहाय्यभूत असलेले इतर सर्व अधिकार वापरुन xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx राज्य शासनाने दिनांक ९ एप्रिल १९७९ ची अधिसूचना क्र. बीकेआर-११७७/ २६२-युडी-५ ने मंजूर केलेल्या नियोजन प्रस्तावास किरकोळ बदल करण्यास याव्दारा मान्यता देत आहे. हे किरकोळ बदल खालील प्रमाणे आहेत.

'' शीव–धारावी मार्गाला जोडणारा 'एच्' ब्लॉकमधील 30 मी. रुंदीचा स्कीम रोड दक्षिणेच्या टोकास किंचित पश्चिमेच्या बाजूस हलविण्यात आला असून बेस्ट आगाराचे क्षेत्र २ हेक्टरवरुन २.२८ हेक्टरपर्यन्त वाढविण्यात आले आहे. वरील कारणामुळे इतर बदल करण्यांत आले आहेत. सर्व बदल सोबत जोडलेल्या नकाशांत दाखविले आहेत. (जोडपत्र –२)."

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ खालील अधिकार व त्याला सहाय्यभूत असलेले अधिकार वापरुन प्राधिकरण याव्दारा, वरील फेरबदलाबाबत शासन राजपत्रांत व ' टाइम्स ऑफ इंडिया व 'लोकसत्ता' या स्थानिक वृत्तपत्रांत नोटीस प्रसिध्द करुन ती प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १ महिन्याच्या आंत जनतेकडून अशा फेरबदलास हरकती व सूचना मागविण्याचे मान्य झाले आहे.

पुढे असा ठराव करण्यांत येत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम १३९ व १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम ७ (अ) ने प्रदान केलेले अधिकार वापरुन प्राधिकरण याव्दारा उपरोल्लेखित खंडानुसार नोटीस प्रसिध्द करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांस देत आहे.

बाब क्रमांक ८ : स्थायी समितीच्या ३ सदस्यांची नियुक्ती.

सदर बाबीवरील विचारविनिमय लांबणीवर टाकण्यात आला.

अध्यक्षांच्या अनुमतीने पुढील तीन बाबी पटलबाबी म्हणून विचारात घेण्यांत आल्या :

पटल बाब क्रमांक १ :

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (मुं.ना.प.प्र.)
जागतिक बँकेचे कर्ज क्रमांक १३५५ आयएन मधून
मुंबई मुख्यभाग दुवा प्रकल्पाकरिता विदेशी चलनाच्या
काही घटकांचा वापर.

बाब टिपणीवर विचार करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजुर केला :–

ठराव क्रमांक १९५ :

असा ठराव करण्यांत येत आहे की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प करारपत्राच्या अनुसूची २ मधील भाग "सी" मधील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तरतूदीमधून रु. १० लाखाची रक्कम ( विदेशी चलनांत ) वळवून तिचा उपयोग इतर सर्व आवश्यक परवानग्यांच्या अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या मुंबई मुख्यभाग दुवा प्रकल्पाच्या विदेशी निमंत्रक सेवेसाठी करण्यास या व्दारे मंजूरी देत आहे.

-: ८ :-

पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना याव्दारे (१) जागतिक बँक (२) केंद्र शासनाचे अर्थ मंत्रालय (आर्थिक व्यवहार विभाग) (३) महाराष्ट्र शासन (४) मुंबई महानगर पालिका व (५) मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम यांच्याशी संपर्क साधण्यास व प्राधिकरणाच्या वतीने रक्कम वळविण्या-संबंधी कर्ज करारनामा, व दुय्यम कर्ज करारनामा वगैरेमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे सर्व अधिकार देत आहे.

पटल बाब क्रमांक २ : बांद्रा-कुर्ला समूहाच्या "ई" ब्लॉकमध्ये प्लॉट क्र. सी-१८ व सी-१७ यावर योग्य इमारत/इमारती बांधण्याची महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास केलेली विनंती.

---

प्राधिकरणाने बाब टिपणीवर विचार करून खालील ठराव मंजूर केला :

ठराव क्रमांक १९६ :

असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा-च्या निधीतून शासकीय (विक्रीकर विभाग) इमारती बांधण्याच्या सूचनेला हे प्राधिकरण मंजूरी देत आहे. सदर सूचनेला प्राधिकरणाच्या मंजूरी समवेत ... स्थायी समितीनेही तीचा दि. १६.१०.८१ च्या ठराव क्रमांक १७० अन्वये मान्यता दिली आहे.

पटल बाब क्रमांक ३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारीवर्ग (गृहनिर्माण कर्जे) विनियम १९८१.

---

प्राधिकरणाने बाब टिप्पणी विचारात घेऊन पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्रमांक १९७ :

असा ठराव करण्यात येत आहे की, स्थायी समितीने दि. १६ ऑक्टोबर १९८१ च्या १९ व्या बैठकीत आपल्या ठराव क्रमांक १८० अन्वये तयार करून शिफारस केल्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचारीवर्ग (गृहनिर्माण कर्जे) प्रारूप विनियम, १९८१ मंजूर करण्यात येत आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ५० अंतर्गत अधिकाराचा वापर करून प्राधिकरणाने हे विनियम तयार केले असल्याचे मानण्यात येईल.

यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

==================

एनपी: ८१२११२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
२४ वी बैठक.

( परिशिष्ट )

दिनांक १९ ऑक्टोबर १९८१.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| १. श्री. रामराव आदिक,<br>नगरविकास व मुंबई महानगर प्रदेश<br>विकास प्राधिकरण मंत्री. | अध्यक्ष |
| २. डॉ. अ.उ. मेमन,<br>मुंबईचे महापौर. | उपाध्यक्ष |
| ३. श्रीमती प्रमिलाबेन याज्ञिक,<br>गृहनिर्माण मंत्री. | सदस्य |
| ४. श्रीमती ताराबाई वर्तक,<br>अध्यक्ष, ठाणे जिल्हा नियोजन आणि<br>विकास परिषद. | सदस्य |
| ५. श्री. सुदाम एच्.भोईर,<br>अध्यक्ष, ठाणे जिल्हा परिषद. | सदस्य |
| ६. श्री. प्रेमकुमार श. शर्मा,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ७. श्री. रामानंद पं. लाड,<br>अध्यक्ष, मुंबई विधुत पुरवठा व<br>परिवहन . समिती,<br>मुंबई महानगर पालिका. | सदस्य |
| ८. श्री. एकनाथ रामचंद्र कोपर्डे<br>मुंबई महानगरपालिका, सदस्य | सदस्य |
| ९. श्री. भिकोबा धोंडिबा झुटे,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | सदस्य |
| १०. श्री. विनायक गणेश धारप,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | सदस्य |
| ११. श्री. अमरनाथ पा. पाटील,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य. | सदस्य |
| १२. श्री. प्रल्हाद हिरानंद आडवानी,<br>अध्यक्ष, उल्हासनगरपालिका परिषद. | सदस्य |
| १३. श्री. युसूफ हफीझ,<br>विधानसभा सदस्य | सदस्य |

१४. श्री.सी.डी.उमाचेन,
विधानसभा सदस्य — सदस्य

१५. श्री. गौरीशंकर त्रिवेदी,
विधानसभा सदस्य — सदस्य

१६. श्री.राम नाईक,
विधानसभा सदस्य — सदस्य

१७. श्री.वकारअहमद गुलाम मोहमद मोमिन,
विधानसभा सदस्य — सदस्य

१८. श्री. राम मनोहर त्रिपाठी,
विधानपरिषद सदस्य — सदस्य

१९. श्री. द.म. सुकथनकर,
महानगरपालिका आयुक्त,
मुंबई महानगर पालिका. — सदस्य

२०. श्री. भा.कृ.हळवे,
महानगर आयुक्त, — सदस्य-सचिव.

==============

# MINUTES OF THE TWENTY-FOURTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

Date : 19th October, 1981 (Monday)
Time : 11.30 A.M.
Place : Committee Room, 6th Floor, Mantralaya, Bombay-400 032.

A list of members present is enclosed. (Annexure).

At the outset Shri E.R. Koparde stated that the Government in Urban Development Department has issued a directive under Section 37 of the M.R.T.P. Act in respect of land near Kalpana Talkies at Kurla. The land in question is in Green Belt. As per Government directive, the half of the land is to be converted into Industries Zone on the condition that the owner will make available free of cost, the remaining land for being developed as garden. He questioned the propriety of such a directive in view of Government's policy of not allowing any more industries in Greater Bombay.

Item No. 1 : Confirmation of the minutes of -
(i) the 23rd Meeting, held on the 23rd March, 1981;
(ii) the Special Meeting, held on the 22nd May, 1981; and
(iii) the Special Meeting, held on the 17th July, 1981.

The minutes of the 23rd meeting held on the 23rd March, 1981 and of the Special Meetings held on the 22nd May, 1981 and 17th July, 1981 were confirmed.

Item No. 2 : Action taken on the minutes of the meetings mentioned in Item No. 1.

After discussion in the course of which certain observations and points noted below were made by certain members, the action taken was noted :-

(1) It was observed that the report of the Director of Health Services to the effect that there is no relation between leprosy and water

sources.....

sources and that water is not the medium for transmission of leprosy and that there are no health hazards to the general public, was not convincing. It was desired that the Director of Health Services should be invited to attend the next meeting of the Authority to clarify his xxxx remarks. Members were also of the opinion that the present lepers colony be shifted at a safe distance where adequate water and other facilities would be available for the inmates. It was informed that while allotting the land in question to the trust of the leprosy affected people in 1976, Government had not consulted BMRDA.

(2) On enquiry from Members, the present position regarding air polluting, monitoring in Thane-Belapur zone by Maharashtra Prevention of Water Pollution Board, it was informed that Board has prepared a phase programme of five years for installing 19 monitoring stations of which 16 have already been established. It was also made clear that for this purpose the Board does not requires BMRDA's financial assistance. Copy of the plan showing the location of stations was agreed to be supplied to the Members.

The Chairman clarified that with enactment of Central Legislation for prevention and control of air-pollution, it would be possible to take effective measures on pollution by industries.

(3) Shri V. G. Dharap stated that the information regarding Middle Vaitarna Project and certain other works and schemes sought by him at the 23rd Meeting of the Authority and which was then agreed to be supplied to him, was not supplied. It was explained that the Middle Vaitarna Project has been investigated by the Superintending Engineer, Bhatsa Project Circle, Thane, who has submitted a draft project report to the Chief Engineer, Irrigation Department, Konkan Region in August, 1981. The project envisages to augment water supply to Greater Bombay by 103 mgd.

Members.....

Members desired that this project be finalised and executed early.

(4) It was stated that the villages through which watermains supplying water to Bombay pass are facing problem of Drinking water and it was suggested that these villages be given water from the water mains. It was also stated that the Bhiwandi Town was facing acute water shortage problem day by day and it was necessary to double the water supply. It was suggested that water from Bhatsa in lieu of Tansa water be supplied to Bhiwandi which has facilities for treating the Bhatsa water.

It was informed that Maharashtra Water Supply and Sewerage Board is already executing a project which included water supply requirements of Bhiwandi Town. A fear was expressed that that project might be delayed and it was therefore, necessary to implement the above suggestion. The Municipal Commissioner agreed to examine this suggestion.

(5) It was complained that the suggestion made at the 23rd Meeting of the Authority to construct approach roads to the proposed overbridge at Kurla was not implemented. It was stated that at Masrani Lane though which the approach road would pass, vacant land is presently available. Any delay in constructing approach road might result in the land in question being encroached upon.

(6) On enquiry from Members, the Chairman BMRDA stated that on the 14th August, 1981 a protocal has been signed between Government of Maharashtra and the Dubai Transport Company (Private) Ltd. (DUTCO) for undertaking (i) the West Island Freeway Project; (ii) the Thane Creek Island Waterway Project and (iii) other projects as may be agreed and desired. He suggested that

copies.....

copies of protocal be circulated to the Members of the Bombay Metropolitan Region Development Authority for information.

Members desired that a note giving details of the first two projects mentioned above together with the views of the B.M.R.D.A. thereon be placed before the Authority at its next Meeting.

(7) A suggestion was made that the wholesale fruit and flower market be located in Bandra-Kurla Complex and that the same should not be shifted to Vashi. It was explained that the efforts are being made to locate such a market in Greater Bombay, as far as possible, by securing vacant land available under the Urban Land(Ceiling and Regulation) Act.

(8) It was suggested that the Authority should be apprised of the latest developments in connection with Nhava-Sheva **Port** Project.

(9) It was also suggested that in view of the magnitude of the works of the Hetavne Project, Government may be requested to appoint separate staff for that Project and the execution of the Project be expedited.

Item No. 3 : Accounts of the Authority for the year 1980-81 and Report of the Financial Adviser thereon.

The Accounts of the Authority for the year 1980-81 and Report of the Financial Adviser thereon were approved.

Item No. 4 : Development of District Centre at Oshiware in Greater Bombay.

After discussion during which the following main points emerged, the **Authority** passed the following Resolution :-

(1) By the side of Oshiware **Bus** Depot there is a BEST land which is allotted to a co-operative society of BEST employees. That land should be excluded from the proposed Growth Centre at Oshiware. This suggestion was accepted.

(2) The table.....

(2) The table giving the statistics of growth of jobs and population in the northern part of Greater Bombay in 1971 and 2001 requires to be corrected on the basis of provisional population figures of 1981 Census published by Government. This suggestion was agreed to. It was also agreed to circulate wardwise population figures of Greater Bombay (as per 1981 Census) to the Members of the Authority.

(3) Major portion of the land proposed to be included in the District Centre is encroached upon by huts. While finalising the project this fact should be borne in mind.

RESOLUTION NO. 191 :

RESOLVED THAT, in furtherenece of the policy on Optimal Regional Structure, the proposal to develop a District Centre at Oshiware, as proposed in the agenda note is hereby approved.

RESOLVED FURTHER that the State Government be apprised of the necessity and urgency of undertaking the development of District Centre at Oshiware and be requested to appoint Bombay Metropolitan Region Development Authority as a Special Planning Authority under Section 40 of the MRTP Act, 1966 for the planning and development of the District Centre, the boundaries of which are defined in the Map No.1 of the Annexure 'A' of the Agenda note.

RESOLVED FURTHER that the privately owned lands within the area earmarked as the District Centre be acquired under the provisions of Bombay Metropolitan Region Development Authority Act for the proper and co-ordinated development of the District Centre.

RESOLVED FURTHER that with a view to expeditiously formulating plans and taking immediate action for the development of the District Centre, a special cell in the Bombay Metropolitan Region Development Authority be created, if necessary, by appointing additional staff.

Item No. 5 : Annual Report by the Bombay Metropolitan Region Development Authority as a Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area for the year 1980-81.

The Authority considered the item note and passed

the .....

the following Resolution :-

RESOLUTION NO. 192 :

RESOLVED THAT the Authority hereby approves the draft of the Annual Report for the year 1980-81 of the Bombay Metropolitan Region Development Authority as a Special Planning Authority for Bandra-Kurla Notified Area, as required under section 133 of the MRTP Act, 1966 and authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government.

Item No. 6 : Grant of T.B. Leave and other concessions to a Steno-Typist in Housing, Urban Renewal and Ecology Board.

The Authority considered the item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 193 :

In exercise of the powers vested in it, under Section 11(2) read with Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974, the Authority approves, post-facto, the action taken by the then Metropolitan Commissioner in granting T.B. leave to Shri R. Radhakrishnan, Steno-Typist, in relaxation of the condition regarding completion of three years' continuous service.

The Authority further approves that Shri Radhakrishnan be granted other monetary concessions viz. grant of diet allowance at Rs. 30/- per month subject to the recommendation of the hospital authorities and on production of vouchers and grant of T.A. etc. as admissible under the rules, in relaxation of the condition referred to above.

Item No. 7 : Minor modification to the Final Planning Proposals of the Bandra-Kurla Notified Area. (Deferred item)

The Authority considered the item note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO. 194 :

RESOLVED THAT the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla Notified Area

appointed .....

appointed under Section 40(1)(c) of the MRTP Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) do in exercise of its powers under Section 40(3) read with Section 113(A)(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, approve of the Planning Proposals sanctioned by the State Government under Notification No. BKR-1177/262-UD-5, dated the 9th April, 1979, being modified marginally in the manner and to the extent specified as follows; that is to say : 30 mtr. wide scheme road in 'H' Block branching from Sion-Dharavi Road is shifted slightly towards west at the southern end and the area of BEST bus depot is increased from 2 Ha. to 2.28 Ha. Due to above, other consequential changes are made. All the changes are more specifically shown on the map enclosed (Annexure II).

RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of the powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf approve of a notice being published in the Official Gazettee and in two local newspapers being the 'Times of India' and the 'Loksatta' inviting objections and suggestions from the public with respect to such modifications not later than 1 month from the date of such notice.

RESOLVED FURTHER THAT the Authority do in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7(A) of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974 authorise the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing clauses.

<u>Item No. 8</u> : <u>Appointment of 3 Members of the Standing Committee.</u>

The consideration of the item was again deferred.

The following 3 Items were then considered as Table Items, with the approval of the Chairman.

<u>Table Item No.1</u> : <u>Bombay Urban Transport Project(BUTP)- Utilisation of Foreign Exchange Component for Bombay Mainland Link Project from World Bank Loan No.1335-IN.</u>

The Authority considered the item note and passed

the .....

the following Resolution :

RESOLUTION NO. 195 :

RESOLVED THAT the Authority hereby approves the proposal to divert a sum of Rs. 10/- lakhs (in foreign exchange) from the Bombay Metropolitan Region Development Authorities provision for Part 'C' of schedule 2 of Bombay Urban Transport Project Loan Agreement, viz. Development Planning and Management - Bombay Metropolitan Region Development Authority, for utilising it for foreign consultancy services for Bombay-Mainland Link Project, of Government of Maharashtra, subject to all other necessary approvals.

RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner is hereby authorised to approach (i) the World Bank, (ii) the Government of India, Ministry of Finance, Department of Economic Affairs, (iii) Government of Maharashtra (iv) Bombay Municipal Corporation and (v) Bombay Electric Supply and Transport Undertaking, and to take all such actions as may be necessary on behalf of the Authority, for diverting an amount of Rs. 10/- lakhs as stated above and also to make suitable amendments to the loan Agreement and the Subsidiary loan Agreement etc.

Table Item No.2 : Government of Maharashtra's request to Bombay Metropolitan Region Development Authority to construct suitable building/buildings on Plot No.C-16 and C-17 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Authority considered the item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 196 :

RESOLVED THAT the Authority approves the proposal regarding construction of Government (Sales Tax Department) Buildings from the Bombay Metropolitan Region Development Authority's fund which the Standing Committee has resolved to accept in anticipation of the Authority's approval, vide its Resolution No. 170, dated 16.10.1981.

Table Item No.3 : BMRDA Employees (Housing Loans) Regulations, 1981.

The Authority considered the item note and passed the following Resolution :

RESOLUTION NO. 197 :

RESOLVED THAT the draft BMRDA Employees (Housing Loans) Regulations, 1981, as prepared and recommended by the

Standing .....

Standing Committee in its 19th Meeting held on the 16th October, 1981, vide Resolution No. 180 are approved. These Regulation shall be deemed to have been prepared by the Authority under Section 50 of the Bombay Metropolitan Region Development Authority Act, 1974.

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

§§§§§§§§§§§

ANNEXURE...

ANNEXURE

## TWENTY-FOURTH MEETING OF THE B.M.R.D.A.

Date : 19th October, 1981.

MEMBERS PRESENT :

| | | |
|---|---|---|
| 1. | Shri Ramrao W. Adik, Minister for Urban Development and BMRDA. | Chairman. |
| 2. | (Dr.) A.U. Memon, Mayor of Bombay. | Vice-Chairman. |
| 3. | Smt. P.B. Yagnik, Minister for Housing. | Member. |
| 4. | Smt. Tarabai Vartak, Chairman, DPDC, Thane. | Member. |
| 5. | Shri S.H. Bhoir, President, Zilla Parishad, Thane. | Member. |
| 6. | Shri P.S. Sharma, Chairman, Standing Committee, B.M.C. | Member. |
| 7. | Shri R.P. Laud, Chairman, B.E.S.T. Committee, B.M.C. | Member. |
| 8. | Shri E.R. Koparde, Councillor, B.M.C. | Member. |
| 9. | Shri B.D. Zute, Councillor, B.M.C. | Member. |
| 10. | Shri V.G. Dharap, Councillor, B.M.C. | Member. |
| 11. | Shri A.W. Patil, Councillor, B.M.C. | Member. |
| 12. | Shri P.H. Advani, President, Ulhasnagar Municipal Council. | Member. |
| 13. | Shri Yusuf Haffiz, M.L.A. | Member. |
| 14. | Shri C.D. Ommachen, M.L.A. | Member. |
| 15. | Shri G .S. Trivedi, M.L.A. | Member. |
| 16. | Shri Ram Naik, M.L.A. | Member. |
| 17. | Shri Vakar Ahmed Gulam Mahmed Momin, M.L.A. | Member. |
| 18. | Shri Ram Manohar Tripathi, M.L.C. | Member. |
| 19. | Shri D.M. Sukthankar Municipal Commissioner, B.M.C. | Member. |
| 20. | Shri B.K. Halve, Metropolitan Commissioner. | Member-Secretary. |

.-.-.-.-.-.-.-